MHNG100014302021

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६८४/२०२१**

**सरकार – विरुध्द – विष्णु**

**निशाणी क्रमांक १ वर आदेश**

**(पारित दिनांक १३ मार्च, २०२६)**

. प्रस्तुतचे दोषारोपपत्र हे महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये दाखल करण्यात आलेले आहे. दोषारोप दाखल झाल्यानंतर, आरोपी हे हजर झालेच नाही.

२. त्यानंतर आरोपी गैरहजर म्हणून न्यायालयाने त्यांचे विरुध्द गैरजमानती अधिपत्र निर्गमीत केले. त्यानंतर देखील आरोपी हे हजर झालेच नाही. प्रकरण हे संक्षिप्त स्वरूपाचे आहे. आरोपी हे मागील ब–याच वर्षांपासुन गैरहजर आहेत, असे अभिलेखावरुन दिसून येते. तसेच भविष्यात न्यायालयात येईल, याची देखील शाश्वती दिसून येत नाही. त्यामुळे मी प्रकरणात प्रक्रीया संहितेचे कलम २५८ अन्वये कार्यवाही करीत आहे. सबब अभिलेखावरील एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

**१.** फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५८ अन्वये आरोपी क्र.१.विष्णु देवराव पडोळे, २.सुभाष देवराव पडोळे, ३.रामभाऊ ईश्वर कुंभरे, ४.विनायक गडेकर, ५.हरिदास घरत, व ६.विलास देवदास पडोळे यांना विनादोषारोप दोषमुक्त करण्यात येऊन, प्रकरण हे बंद करण्यात येते.

**२.** जप्त रोख रक्कम ही अपील कालावधी नंतर शासन जमा करण्यात यावी. तसेच इतर जप्त मौल्यहीन मुद्देमाल हा अपील कालावधी संपल्यानंतर नाश करण्यात यावा.

**३.** सबब प्रकरण नस्ती करण्यात येते.

Sd/-

**( रा.भा. डोळे )**

दिनांक : १३.०३.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरेड

**<u>: प्रमाणपत्र :</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : – कु.एस.बी.घर्डीनकर

न्यायालयाचे नांव : – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उमरेड

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक : –१७.०३.२०२६

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३